महा मेट्रो

PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## १९ व्या ‘अर्बन मोबिलिटी इंडिया’ परिषदेत महामेट्रो ठरली 'सर्वोत्कृष्ट प्रदर्शक'; केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान



भुवनेश्वर: ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथे आयोजित १९ व्या ‘अर्बन मोबिलिटी इंडिया’ (UMI) परिषदेत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (महामेट्रो) आपल्या अत्याधुनिक तांत्रिक नवोपक्रमांच्या बळावर मानाचा 'सर्वोत्कृष्ट प्रदर्शक' पुरस्कार पटकावला आहे. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार आणि ऊर्जा मंत्री मा.श्री. मनोहर लाल यांच्या हस्ते महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

'अर्बन ॲक्सेसिबिलिटी अँड लिव्हॅबिलिटी इन द डिजिटल एज' या मुख्य संकल्पनेवर आधारित या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

● २०४७ पर्यंत ८० कोटी नागरिक  शहरात राहतील; भारत लवकरच अमेरिकेला मागे टाकेल: केंद्रीय मंत्री मनोहर लाल

पुरस्कार वितरणप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री श्री. मनोहर लाल यांनी देशातील भविष्यातील शहरीकरणाचे चित्र आणि वाहतूक नियोजनाची गरज अधोरेखित केली.

ते म्हणाले, "सध्या देशातील एकूण लोकसंख्येपैकी ३७ टक्के लोक शहरी भागात राहतात. २०४७ पर्यंत हा आकडा ५० टक्क्यांच्या वर जाईल आणि त्यावेळी देशाची लोकसंख्या सुमारे १६० कोटी असेल. याचाच अर्थ तब्बल ८० कोटी नागरिक शहरांमध्ये राहतील. इतक्या मोठ्या लोकसंख्येसाठी सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे अत्यंत आवश्यक असून, त्याचे नियोजन आत्तापासूनच सुरू करणे गरजेचे आहे."

नियोजनाची दिशा स्पष्ट करताना ते पुढे म्हणाले, "सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करताना समाजातील आर्थिकदृष्ट्या सर्वात दुर्बल व तळागाळातील घटकांचा प्राधान्याने विचार झाला पाहिजे. सध्या देशात जवळपास १,१८५ किमी लांबीचे मेट्रो जाळे यशस्वीरीत्या कार्यरत आहे, तर अमेरिकेत हे जाळे १,३८५ किमीचे आहे. मेट्रो विस्ताराचा सध्याचा वेग पाहता भारत लवकरच या बाबतीत अमेरिकेलाही मागे टाकेल. तसेच भविष्यातील वाहतूक सक्षम करण्यासाठी वाहतुकीच्या विविध साधनांचे एकात्मीकरण (मल्टी-मॉडल इंटिग्रेशन) करणे अनिवार्य आहे."

महामेट्रोच्या स्टॉलवर अत्याधुनिक डिजिटल प्रणालींचे सादरीकरण

परिषदेदरम्यान मान्यवरांनी महामेट्रोच्या स्टॉलला भेट देऊन पाहणी केली. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रकल्पात राबवण्यात येत असलेल्या विविध डिजिटल प्रणालींची सविस्तर माहिती दिली.

प्रदर्शनात महामेट्रोने सादर केलेल्या प्रमुख प्रणाली:

डिजिटल प्रोजेक्ट मॅनेजमेंट डॅशबोर्ड: प्रकल्पांच्या पारदर्शक आणि वेळेत अंमलबजावणीसाठी रिअल-टाइम संनियंत्रण.

संचालन व देखभाल डिजिटल रूपांतरण (O&M): दैनंदिन मेट्रो संचालन आणि देखभालीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.

डिजिटल आय आणि मास्टरमाइंड: प्रवासी सुरक्षेसाठी प्रगत सुरक्षा आणि संनियंत्रण यंत्रणा.

सीमलेस 'वन ॲप' जर्नी: तिकीट बुकिंगपासून संपूर्ण प्रवासासाठी प्रवाशांना एकात्मिक डिजिटल अनुभव.

स्मार्ट आणि कनेक्टेड मोबिलिटी: प्रवाशांना शेवटच्या टप्प्यापर्यंत (Last-Mile) अखंड वाहतूक सुविधा.

सोशल मीडिया एंगेजमेंट: प्रवाशांशी जलद आणि थेट संवादाची प्रभावी डिजिटल माध्यमे.